| | |
|---|---|
| **MHPU170007282021** | दाखल तारीख – १८/०१/२०२३<br>नोंदणी तारीख – १८/०१/२०२३<br>निकाल तारीख – ०६/०८/२०२६<br>**कालावधी – दि. ०३. म.०६. व.१९** |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग इंदापूर यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी प्र.चं.बारटक्के)

नियमित फौजदारी खटला क्र.१५३/२०२४ **निशाणी क्रमांकः–३३.**

| | |
|---|---|
| फिर्यादी पक्ष – | **निता शेखर शिंदे.**<br>वयः–५३ वर्षे धंदाः–शेती,<br>रा. मेन रोड, इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे. |
| फिर्यादी पक्षातर्फे विधीज्ञ – | श्री. नंदकुमार गणपतदास शहा |
| आरोपी – | **शुभांगी श्रीकांत माने.**<br>वय — ६० वर्ष, धंदा – घरकाम,<br>रा. ४७/२/ए.लेन नं.३ हिवन पार्क,<br>मोहम्मदवाडी, पुणे,<br>ता. इंदापूर, जि. पुणे. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ – | श्री. ए.बी.घोगरे. |

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | ०७/११/२०२२ |
| फिर्याद दाखल तारीख | १८/०१/२०२३ |
| प्रतिकथन नोंदविल्याची तारीख | १२/०६/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १७/०७/२०२५ |
| न्यायनिर्णयाकरिता राखीव ठेवलेली तारीख | ०६/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०६/०८/२०२६ |
| शिक्षेची तारीख, जर दिली असेल तर | –––– |

## आरोपीचे विवरण

| अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामिनावर सोडल्याची तारीख | दोषारोप | शिक्षा अथवा निर्दोष मुक्त | शिक्षेबाबत विवरण | उपभोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **शुभांगी श्रीकांत माने.** | -- | -- | भा.द.वि. कलम ५०४ आणि ५०६ प्रमाणे. | निर्दोष. | --- | --- |

## तपासलेले साक्षीदार

**अ. फिर्यादी पक्षातर्फे :-**

| **अ.क्र.** | **साक्षीदारांचे नाव** | **पुराव्यातील स्थान** | **निशाणी क्र.** |
|---|---|---|---|
| सा.क्र.१. | निता शेखर शिंदे | फिर्यादी | २५ |

**ब. बचाव पक्षातर्फे :- नाही.**

## निशाणी क्रमांकाची यादी

**अ. फिर्यादी पक्षातर्फे :-**

| **अ.क्र.** | **निशाणी** | **पुराव्याचे स्थान** |
|---|---|---|
| १. | २६ | अदखलपात्र गुन्ह्याची प्रत. |

**ब. बचाव पक्षातर्फे :- नाही.**

| | | | |
|---|---|---|---|
| **ड. मुद्देमाल** | **:-** | - | - |

## न्यायनिर्णय

(जाहीर केल्याची तारीख ०६/०८/२०२६)

### फिर्यादी पक्षाचा खटला थोडक्यात खालीलप्रमाणेः-

आरोपी ही फिर्यादीचे मयत पती शेखर यांची बहिण म्हणजेच फिर्यादीची ननंद आहे. आरोपी वि फिर्यादी यांच्यामध्ये एकत्र कुटूंबाच्या जमीनी संदर्भात दिवाणी वाद चालु आहेत.

०२. दिनांक ०७/११/२०२२ रोजी फिर्यादी आणि आरोपीची इंदापूर तहसिल कार्यालयामध्ये सुनावणीची तारीख होती. त्यावेळी फिर्यादी ही तिची मुलगी पुजा हिचेसह तारखेसाठी दुपारी ०२.०० वाजेच्या सुमारास तहसिल कार्यालय, इंदापूर यांच्या प्रांगणात उभी होती. त्यावेळी आरोपी ही फिर्यादीच्या जवळ आली व फिर्यादीस दम दिला की, “२६१/१, २६१/२, २६५ या शेतजमीनी माझ्या आहेत, त्यामध्ये तु पाय टाकायचा नाही, मी जमीन विकुन टाकणार आहे व फिर्यादीस आईघाले, मादरचोद व इतर घाणेरड्या अर्वाच्च भाषेत शिव्या दिल्या तसेच "तुला जीव मारून टाकीन" असा दम दिला. त्यावेळी फिर्यादीची मुलगी पुजा आलकेश डमढेरे हिने आरोपीला समजावून सांगितले की, "येथे भांडण करू नका, शिवीगाळ करू नका, नाहीतर तक्रार करू". त्यामुळे आरोपी तेथुन निघुन गेली व आरोपी हिने जाताना फिर्यादीस दम दिला की, "आज तु सुटली पुन्हा सापडली तर तुला जिवे मारून टाकीन".

०३. त्यानंतर फिर्यादी ही तक्रार करणेसाठी इंदापूर पोलीस स्टेशन येथे गेली. परंतु पोलीसांनी फिर्याद घेतली नाही. त्यानंतर दिनांक ०१/१२/२०२२ पर्यंत दिवसाआड फिर्यादी ही पोलीस स्टेशनला जात होती, परंतु पोलीस हे फिर्यादीला "उद्या या परवा या" असे म्हणुन फिर्याद घेणेस टाळाटाळ करत होते. त्यानंतर फिर्यादी यांनी पोलीस निरीक्षक, इंदापूर यांना भेटून इंदापूर पोलीस तिची फिर्याद घेत नाहीत अशी तक्रार केली. त्यानंतर तिची फिर्याद दिनांक ०१/१२/२०२२ रोजी एन.आर.सी. नं.१३४३/२०२२ ने इंदापूर पोलीसांनी घेतली. परंतु त्यानंतर पोलीसांनी आरोपी विरूध्द कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यामुळे फिर्यादीने सदरची फिर्याद दाखल केली आहे.

०४. फिर्यादीची पडताळणी केल्यानंतर निशाणी १ वरील आदेशानुसार आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ५०४ आणि ५०६ अन्वये आदेशिका काढण्याचा आदेश पारित करण्यात आला. त्यानंतर आरोपीने हजर होवून जामिन

दिला. आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ५०४ आणि ५०६ या अपराधांसाठी निशाणी १८ कडे प्रतिकथन नोंदविले आणि तिला अपराधाचा तपशिल तिच्या मातृभाषेत समजावून सांगितला. आरोपीने अपराध नाकबूल केला आणि तिच्या विरुध्दचा खटला हा चालविण्यात यावा असे म्हणणे मांडले. त्यानंतर फिर्यादीची साक्ष नोंदविण्यात आली. त्यानंतर फिर्यादी गैरहजर राहील्याने आणि फिर्यादीतर्फे पुढील पुरावा देण्यात आला नसल्याने निशाणी १ वरिल आदेशानुसार फिर्यादीचा पुरावा बंद करण्यात आला. त्यानंतर आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचे निवेदन निशाणी क्रमांक ३० कडे नोंदविण्यात आले. आरोपीने खोटी केस केली असल्याचे कथन केले. आरोपीने बचावामध्ये कोणताही पुरावा दिला नाही.

०५. माझेसाठी उपस्थित झालेले विचाराधीन मुद्दे आणि त्यावरील माझे सकारण निष्कर्ष हे खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | दिनांक ०७/०२/२०२२ रोजी दुपारी ०२:०० वाजेच्या सुमारास इंदापूर तहसिल कार्यालय, इंदापूर, येथे आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ केली व अपमान करुन तिला प्रक्षोभित केले अशा प्रक्षोभनामुळे तिच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा असा त्यामागचा उद्देश होता व त्याद्वारे भारतीय दंड सहितेचे कलम ५०४ प्रमाणे गुन्हा केला हे फिर्यादीने सिध्द केले आहे काय ? | **... नाही.** |
| **२** | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी देवून, फौजदारीपात्र धाकदपटशा करत दहशत निर्माण केली व त्याद्वारे भारतीय दंड सहितेचे कलम ५०६ गुन्हा केला हे फिर्यादीने सिध्द केले आहे काय? | **... नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ३ | आदेश कोणता ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ व २ बाबत** –

०६. आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ५०४ आणि ५०६ अन्वयेचा अपराध सिध्द होण्याकरीता आरोपीने सार्वजनिक शांततेचा भंग करण्याच्या उद्देशाने फिर्यादीला शिवीगाळ करुन अपमान केला व फिर्यादीला धमकी देवून फौजदारी पात्र धाकदपटशा निर्माण केला या बाबी निसंशयरित्या सिध्द होणे आवश्यक आहे.

०७. मुळ फिर्यादी निता शेखर शिंदे हिने सरतपासात असे कथन केले की, दिनांक ०७/११/२०२२ रोजी तिची तहसिल कार्यालय येथे तारीख होती. दुपारी २:०० च्या सुमारास ती व तिची मुलगी पुजा हे तहसिल कार्यालयाच्या प्रांगणात उभे होते. त्यावेळी आरोपी हिने फिर्यादीला "आयघाले, मादरचोद'' अशी शिवीगाळ केली आणि जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच आरोपीने फिर्यादीला 'शेतात पाय ठेवू देणार नाही, तुला शेती करु देणार नाही, शेती विकून टाकेन' अशी धमकी दिली. तसेच 'तुझा खुन करेन' अशी धमकी दिली. फिर्यादीच्या मुलीने आरोपीला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी आरोपीने 'आता सोडून दिले आहे, तुझेकडे परत बघेन' असे म्हटले. त्यानंतर फिर्यादी आणि तिची मुलगी हे इंदापूर पोलीस ठाण्यात गेले. पोलीसांनी तिची तक्रार घेतली नाही. पोलीसांनी फिर्यादीला कोर्टात जाण्यास सांगितले. फिर्यादी इंदापूर येथील वरिष्ठ पोलीस अधिका–यांना भेटली. त्यानंतर दिनांक ०१/१२/२०२२ रोजी पोलीसांनी अदखलपात्र गुन्हा निशाणी २६ नोंदविला.

०८. आरोपीच्या विधीज्ञांनी सदर साक्षीदार हिचा उलट तपास घेतला. त्यामध्ये तिने असे कथन केले आहे की, फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये अनेक वर्षांपासून मालमत्तेसंदर्भात दिवाणी वाद सुरू आहेत.

०९. फिर्यादीने सरतपासात ज्या शिव्या, धमक्या व संवाद सांगितले आहेत, त्यांचा अदखलपात्र गुन्ह्याच्या अर्जामध्ये कुठेही उल्लेख नाही, हे तिने स्पष्टपणे मान्य केले आहे. "पोलीसांनी का लिहिले नाही हे मला माहित नाही" असे उत्तर तिने दिले. फिर्यादीने पोलीसांनी दिलेली अदखलपात्र गुन्ह्याची प्रत स्वतः वाचल्याचेही मान्य केले आहे. तरीसुद्धा त्यामध्ये शिवीगाळ व धमक्यांचा उल्लेख नसल्याबाबत तिने कोणतीही हरकत घेतली नाही किंवा त्याबाबत पोलीसांना विचारणा केली नाही. त्याचप्रमाणे फिर्यादीच्या फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०० अन्वयेच्या जबाबामध्ये देखील सदर शिवीगाळीबाबत व धमकीबाबत उल्लेख नाही. त्यामुळे असा निष्कर्ष काढणे स्वाभाविक आहे की, सरतपासात सांगितलेला मजकूर हा नंतरचा विचार करून केलेला सुधारित खुलासा आहे. जर प्रत्यक्षात शिवीगाळ झाली असती आणि अशा गंभीर धमक्या दिल्या असत्या, तर त्या प्रथम तक्रारीत निश्चित नमूद झाल्या असत्या. न्यायशास्त्रानुसार प्रथम तक्रारीतील अशा महत्त्वाच्या बाबींचा अभाव हा नंतर केलेले सुधारित कथन मानले जाते आणि अशा सुधारित साक्षीवर महत्वाचा दुजोरा देणारा पुरावा असल्याशिवाय दोषसिद्धी करता येत नाही. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादीच्या सरतपासातील कथनांना दुजोरा देणारा कोणताही पुरावा नाही.

१०. फिर्यादीने हे ही मान्य केले आहे की, दि.०७/११/२०२२ ते दि.०१/१२/२०२२ या कालावधीत पोलीसांनी तक्रार घेतली नाही म्हणून तिने कोणतीही लेखी तक्रार वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केली नव्हती. गुन्हा घडल्याचा दावा करणारी व्यक्ती जवळपास एक महिना कोणतीही लेखी कारवाई करत नाही, ही बाब

तिच्या कथनावर संशय निर्माण करते.

११. बचाव पक्षाने फिर्यादीस आरोपीच्या पतीने आधीच पोलीसांकडे तक्रार दिली होती, तसेच दोन्ही पक्षांमध्ये सातत्याने वाद सुरू असल्याचे सुचविले आहे. फिर्यादीने ते नाकारले असले, तरी तिच्याकडून मालमत्तेच्या वादाचे अस्तित्व नाकारता आलेले नाही. त्यामुळे फिर्यादीची तक्रार ही वैमनस्यातून प्रेरित असल्याची बचावाची भूमिका शक्य वाटते. फिर्यादीने सांगितलेल्या कथित घटनेच्या वेळी तहसिल कार्यालय परिसरात अनेक लोक उपस्थित असतात, अशी परिस्थिती असताना फिर्यादी पक्षातर्फे कोणताही स्वतंत्र व निष्पक्ष साक्षीदार न्यायालयासमोर तपासलेला नाही. महत्वाचे म्हणजे फिर्यादीच्या मुलीची साक्ष देखील घेण्यात आलेली नाही. अशा परिस्थितीत केवळ वैमनस्य असलेल्या फिर्यादीच्या एकट्या व सुधारित साक्षीवर दोषसिद्धी करणे योग्य व न्याय संगत ठरत नाही.

१२. फौजदारी न्यायशास्त्राचा मूलभूत सिद्धांत असा आहे की, फिर्यादी पक्षाने आरोपीचा गुन्हा वाजवी शंकेपलीकडे सिद्ध करणे आवश्यक असते. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादीच्या साक्षीतील विसंगती, प्रथम तक्रारीतील महत्त्वाच्या बाबींचा अभाव, नंतर केलेल्या सुधारणा, मालमत्तेच्या वादातून निर्माण झालेले वैमनस्य आणि स्वतंत्र पुराव्याचा अभाव यामुळे फिर्यादी पक्षाची कथा विश्वासार्ह राहत नाही. म्हणून फिर्यादी पक्ष आरोपी विरुद्धचा आरोप वाजवी शंकेपलीकडे सिद्ध करण्यात पूर्णतः अपयशी ठरलेला आहे या निष्कर्षाप्रत मी आलो आहे.

१३. अशा परिस्थितीत आरोपीविरुध्द कोणताही ठोस पुरावा समोर आलेला नाही. अशा परिस्थितीत आरोपीविरुध्द दाखल करण्यात आलेला दोषारोप शाबीत करण्यासाठी पुरेसा पुरावा नसल्याने आरोपी ही सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. हे सर्व पाहता मी मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर '**नाही**' असे देतो.

**मुद्दा क्रमांक ३ बाबत** –

१४. मुद्दा क्र. १ व २ च्या निष्कर्षानुसार फिर्यादी पक्ष हा आपली बाजू सबळ पुराव्यानिशी सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे. त्यामुळे आरोपीची भारतीय दंड संहिता कलम ५०४ आणि ५०६ अन्वयेच्या गुन्ह्यामधून दोषमुक्त करणे आवश्यक आहे. सबब, मी मुद्दा क्र.३ बाबत खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

०१. आरोपी नामे **शुभांगी श्रीकांत माने** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) भारतीय दंड संहिता कलम ५०४ आणि ५०६ या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

०२. आरोपीचा जात मुचलका व जामीनकदबा रद्द करण्यात येत आहे आणि तिला मुक्त करण्यात येत आहे.

०३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये रक्कम रुपये ५,०००/– च्या जामिनाची पूर्तता करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करणेत आला.)

BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT
Digitally signed by BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT
Date: 2026.08.06 15:46:45 +0530

इंदापूर.
दिनांक – ०६/०८/२०२६

**(प्र.चं. बारटक्के)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर,
ता. इंदापूर, जि. पुणे.

| | | |
|---|---|---|
| **प्रमाणपत्र**<br>मी याद्वारे असे प्रमाणीत करतो की, प्रस्तुत पी.डी.एफ. फाईल मधील मजकूर हा मुळ आदेशातील मजकूराच्या शब्दानुसार समान आहे. | | |
| न्यायालयाचे नाव | .. | श्री.प्र.चं.बारटक्के.<br>सह दिवाणी न्यायाधीश क स्तर तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर, ता. इंदापूर, जि.पुणे. |
| लघुलेखकाचे नाव | .. | एस. एल. तांबोळी,<br>लघुलेखक निम्नश्रेणी –३ |
| आदेशाची तारीख | .. | ०६/०८/२०२६. |
| न्यायालयाने सही केल्याची तारीख | .. | ०६/०८/२०२६. |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | .. | ०६/०८/२०२६. |